पुढारी | मंगळवार २१ ऑगस्ट २०१८

## फोंडाघाट महाविद्यालयात वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

**फोंडाघाट : वार्ताहर**

इंग्रजी ही ज्ञानाची भाषा असली तरी मराठी ही प्राणाची भाषाची आहे. मराठी भाषेतील साहित्याने महाराष्ट्राला घडविले आहे. कारण साहित्य हे माणसाच्या भावभावनांचे प्रतिक आहे. साहित्यातून माणूस व्यक्त होतो. तर माणसेही साहित्य आणि कलेमुळे नावारूपाला आली आहेत. त्यापैकीच मी एक कलोपासक आहे, असे प्रांजळ मत कवी शशिकांत तिरोडकर यांनी व्यक्त केले. फोंडाघाट महाविद्यालयाच्या वाङमय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कविता ही फुलपाखरासारखी असून तिला अलगद पकडता आली पाहिजे, अशी साहित्यविषयक भूमिकाही श्री. तिरोडकर यांनी मांडली. सावर्डे येथील वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. तानाजी कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत शेकडे होते. डॉ. सतीश कामत यांनी मंडळाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला.

सकाळ सिंधुदुर्ग, रविवार, २६ ऑगस्ट २०१८

## वृक्ष संवर्धनाचा संकल्प करा : प्राचार्य शेकडे

**कणकवली :** वनसंज्ञेचे महत्त्व अपार असून, वनसंपदा टिकविणे ही काळाची गरज बनली आहे. त्यामुळे झाडे लावली पाहिजेत आणि ती जगवलीही पाहिजेत, असा सर्वांनी संकल्प करुया, असे प्रतिपादन फोंडाघाट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत शेकडे यांनी केले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने झाडांना राखी बांधण्याचा कार्यक्रम घेतला. त्यावेळी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. शेकडे यांनी, मानवी जीवनातील झाडांचे महत्त्व अधोरेखित केले. प्रत्येक विद्यार्थ्यांनी झाडांच्या रक्षणाची जबाबदारी उचलली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी बनवलेली राखी प्रतिनिधीक स्वरूपात डॉ. शेकडे यांच्या हस्ते झाडाला बांधण्यात आली. या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख प्रा. डी. बी. ताडेराव, प्रा. रूपाली माने, ग्रंथपाल विद्या मोदी यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढारी | सिंधुदुर्ग, शनिवार २५ ऑगस्ट २०१८

## फोंडाघाट महाविद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धा

**फोंडाघाट (वार्ताहर) :** कला आणि वाणिज्य महाविद्यालय फोंडाघाट येथे राष्ट्रीय सेवा योजना व नेहरू युवा केंद्र, सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान जागृतीविषयी प्रश्नमंजुषा कार्यक्रम झाला. नेहरू युवा केंद्राच्या श्रीमती तोरसकर यांनी कार्यक्रमाच्या स्वरूपाविषयी माहिती दिली. प्रश्नमंजुषा कार्यक्रमात कला आणि वाणिज्य शाखेचे प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाचे विद्यार्थी सहभागी झालेले होते.

सुमारे तीन फेऱ्यांमध्येही स्पर्धा घेण्यात आली. शेवटी तीन स्पर्धकांना विजयी घोषित करण्यात आले. त्यात प्रथम- रश्मी निळेकर, द्वितीय- उन्नती कोदे, तृतीय- संतोष कातरूढ या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. विजेत्या विद्यार्थ्यांना श्रीमती तोरसकर, श्रीयुत लोके व प्रा.डी.बी.ताडेराव यांच्या हस्ते चषक देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ.एस.आर. रायबोले यांनी केले. कार्यक्रमाला डॉ.एस.एन.कामत, डॉ.आर.बी. पाटील, डॉ.बी.ए.सुरवसे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

पुढारी | सोमवार २७ ऑगस्ट २०१८

## फोंडाघाट महाविद्यालयात स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन

**फोंडाघाट : वार्ताहर**

सध्याचा काळ स्पर्धेचा काळ आहे, सर्वत्र स्पर्धा आहे. या स्पर्धेला घाबरून न जाता प्रत्येकाने स्पर्धेत उतरले पाहिजे असा संदेश फोंडाघाट महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत शेकडे यांनी दिला.

महाविद्यालयात रोजगार व स्वयंरोजगार विभाग आयोजित 'स्पर्धा परीक्षा आणि नोकरीच्या संधी' या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून डॉ. शेकडे बोलत होते. डॉ. शेकडे यांनी तरूणांना उदासिनता झटकण्याचा सल्ला देत आपण यापुढे उत्तमोत्तम मार्गदर्शकांना बोलवून स्पर्धा परीक्षाविषयी मार्गदर्शन करणारे वर्ग आयोजित करणार असल्याचे सांगितले. प्रमुख मार्गदर्शक बाजीराव जांभेकर यांनी स्पर्धा परीक्षा म्हणजे नेमके काय, ते सविस्तर सांगितले. युपीएससी आणि एमपीएससी कडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांची माहिती दिली. सैन्यभरती आणि पोलिस भरती विषयी मार्गदर्शन केले. राजपत्रित व अराजपत्रित अधिकारी कसे होता येते या विषयी सांगितले. 'शेवटी गुर्मीत नको, आर्मीत जा' असे सांगत आपल्या जीवनाला योग्य दिशा द्या, असे सांगितले. पॉवर पॉईंट प्रझेंटेशनद्वारे प्रा. जांभेकर यांनी केलेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांना भावले. गुरूकुल करिअर अकॅडमीचे प्रा. सुनील ढोणकुसे यांनी स्पर्धा परीक्षांविषयीची चळवळ वाढविण्याच्या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत मांडले. स्पर्धेसाठी प्रवृत्त व्हा, सकारात्मक विचार करा, वेळेचे नियोजन करून अभ्यासाला सुरुवात करा. मात्र, हे करत असताना आत्मविश्वास कुठेही ढळू देऊ नका, असे प्रा. ढोणकुसे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात गुरूकूल करिअर अकॅडमीविषयी माहिती देणार ध्वनीचित्रफीत दाखवण्यात आली. प्रास्ताविक रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे प्रमुख प्रा. डी. बी. ताडेराव यांनी केले. आभार डॉ. एस. आर. रायबोले यांनी मानले. कार्यक्रमात डॉ. एस. एन.कामत, प्रा. एस. एम. आखाडे, प्रा. व्ही. व्ही. पाटील, प्रा. सारिका राणे आदी उपस्थित होते.

ARTS & COMMERCE COLLEGE
Phondaghat, Tal.kankavli, Dist.Sindhudurg

